**सं.फौ.प्र.क्र.४७०/२०२२**
**शासन वि.** मारुती महादु मोरे
निशाणी क्र.

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालय, कर्जत.**

१ गुन्हा घडल्याची तारीख :- १३.१०.२०२२

२ फिर्याद दाखल तारीख :- १७.१०.२०२२

३ फिर्यादीचे नांव :- मुकुंद दत्तात्रेय दरेकर,
सहा.फौजदार नेरळ पोलीस ठाणे

४ आरोपींचे नांव :- **मारुती महादेव मोरे,**
वय-५५ वर्षे, धंदा-चालक,
रा.टेपआळी नेरळ,ता.कर्जत, जि.रायगड

**५ <u>आरोपाचा आशय</u> :-**

हे की दिनांक १३.१०.२०२२ रोजी १८:४४ वाजणेच्या सुमारांस मौजे नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड येथील बाजारपेठेतील माउली मेडीकल समोरील सार्वजनिक रस्त्यावर तुम्ही तुमच्या ताब्यातील ॲटो रिक्षा क्र.एम.एच.४६/ए.झेड.४०१७ ही सार्वजनिक वाहतुकीचे रस्त्यावर इतर वाहनांना जाणे येण्यासाठी अडथळा होईल अशा स्थितीत उभी करून ठेवली व इतर लोकांचे वाहनांना तसेच जिवीतास धोका निर्माण होईल अशास्थितीत उभी करून ठेवली आणि याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधान कलम २८३ अन्वये माझे अधिकारक्षेत्रात शिक्षेस पात्र गुन्हा केला आहे.

कर्जत
दिनांक:१७/१०/२०२२

**(सुजाता रा.शिंदे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत.

**<u>आरोपीचे प्रतिकथन:-</u>**

प्र.क्र. १ :-तुम्हांला या खटल्याच्या दस्तऐवजाच्या प्रती मिळाल्या आहे काय ?
उत्तर :-होय

प्रश्न क्र. २ :-मी तुम्हांला तुमच्या मातृभाषेत समजावून सांगितलेला
गुन्हयाचा आशय कळाला आहे काय ?

उत्तर :-होय

प्रश्न क्र. ३ :-तुम्हांला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तर :-होय, मला गुन्हा कबुल आहे.

--------------
आरोपीची सही

समक्ष,

**(सुजाता रा. शिंदे )**
दिनांक १७/१०/२०२२ न्यायदंडधिकारी प्रथम वर्ग,कर्जत

## :: न्यायनिर्णय ::

आरोपीने स्वच्छेने गुन्हा कबूल केला आहे. शिक्षेबाबत त्याचे म्हणणे ऐकण्यात आले. आरोपीने यापुर्वी अशा प्रकारचा गुन्हा केला नसल्याचे कथन केले. म्हणून आरोपीने त्यास कमीत कमी दंड करण्याची विनंती केली. या न्यायालयाच्या मते आरोपीने केलेल्या कथनामध्ये तथ्य आढळून येते. वरील कारणास्तव व गुन्हयाचे स्वरुप लक्षात घेता या न्यायालयाच्या मते खालील प्रमाणे शिक्षा न्यायाचे दृष्टीने योग्य होईल. म्हणून मी खालील आदेश देत आहे.

## :: आदेश ::

आरोपी **मारुती महादु मोरे,** रा.टेपआळी नेरळ, ता.कर्जत, जि. रायगड यास फौ.प्र.सं.कलम २५५(२) प्रमाणे भारतीय दंड विधान कलम २८३ प्रमाणे दंडनीय अपराधास दोषी ठरविण्यात येत असून रक्कम रू.२००/—(रक्कम रूपये दोनशे मात्र) एवढया दंडाची शिक्षा सुनावण्यात येते. दंड न भरल्यास एक दिवस साध्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येत आहे.

खुल्या न्यायालयात घोषित.

**(सुजाता रा. शिंदे )**
दिनांक:१७/१०/२०२२. न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, कर्जत.